क्रमांक : प्र/आस्था (४)/३५४७/२५-२६ दिनांक :

**विषय : <u>मा.महानगर आयुक्त, अति.महानगर आयुक्त-(१) व (२) , मेट्रो संचालक व सह महानगर आयुक्त</u> यांच्या दालनातील ई.पी.बी.ए.एक्स. दूरध्वनी यंत्रणा व दूरध्वनी संच यांच्या <u>वार्षिक देखभाल व दुरूस्ती दरकंत्राट करणेबाबत.</u>**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयाच्या नवीन इमारतीमधील मा.महानगर आयुक्त, अति.महा.आयुक्त-(१) व (२), तसेच मेट्रो संचालक यांच्या दालनातील ई.पी.बी.ए.एक्स दूरध्वनी यंत्रणा व दूरध्वनी संचाचे सर्वंकष देखभाल व दुरूस्तीचे वार्षिक कंत्राटकरणेबाबत निविदा/दरपत्रक मागवित आहे. आपले निविदापत्र बंद लिफाफ्यातून खालील पत्यावर **दि. २७ जानेवारी, २०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करावे.**

२. प्राधिकरणातील पॅनासोनिक TDA100 ,TES824 व NS300 कंपनीचे दूरध्वनी संचासंबंधीची माहिती खालील तक्त्यात नमुद करण्यात आलेली आहे. तरी **<u>दर नमुद करताना GST व इतर कोणताही दर अंतर्भूत नसावा.</u>**

| अनु.क्र. | तपशिल | नग | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | Panasonic Digital System **Model NS-300 & NS320 Unit,** 24 Trunk Lines / 32 Digital Ports/32 Analog Extension Ports with inbuilt DISA & Voice Mail system.<br>(मा.महा.आयुक्त , अति.महा आयुक्त (१) व (२) यांचे दालन, ८वा व ९वा मजला) | ०१ | |
| २ | पॅनासोनिक TES824<br>(मेट्रो संचालक यांचे दालन, ७ मजला) | ०१ | |
| ३ | Panasonic Digital System **Model NS-300** 6 Line Display /08 Digital Ports card (08 port digital card)<br>(सह.महा.आयुक्त यांचे दालन, १ला मजला) | ०१ | |
| | **Contract value (INR)** | | |
| | **GST** | | |
| | **Total Contract Value** | | |

३. प्राधिकरणाच्या नवीन इमारतीमधील मा.महानगर आयुक्त, अति.महा.आयुक्त-(१) व (२) तसेच मेट्रो संचालक यांच्या दालनातील ई.पी.बी.ए.एक्स दूरध्वनी यंत्रणा व दूरध्वनी संचाचे सर्वंकष देखभाल व दुरूस्ती दर कंत्राटाच्या अटी व शर्ती पूढीलप्रमाणे असतील.

(कृ.मा.पहा)

(१) सदर दूरध्वनी संचाचा वार्षिक सर्वंकष देखभाल व दुरूस्ती कराराचा कालावधी सन २०२६ ते २०२७, सन २०२७-२८ व सन २०२८ ते २०२९ या ३ वर्षाकरिता राहिल. प्रथम वर्षातील सेवा समाधानकारक निदर्शनास आल्यांनतर द्वितीय व तृतीय वर्षाकरिता कंत्राट रकमेच्या मुळ रक्कमेवर १०% वाट देण्यात येईल.

(२) सेवा पुरवठादारास यापूर्वी ई.पी.बी.ए.एक्स. दूरध्वनी यंत्रांच्या संपूर्ण देखभाल व दुरुस्ती बाबतचा अनुभव असावा तसेच पुरवठादारांचे कार्यालय मुंबई व मुंबई उपनगर परिसरात असावे.

(३) सदर वार्षिक कंत्राटामध्ये प्रत्येकी ६ महिन्यास देय असलेला देखभाल व दुरूस्तीबाबतचा सेवा अहवाल (Service Report) सादर केल्यानंतर देय असलेली रक्कम प्रत्येकी सहा महिन्यांनी अदा करण्यात येईल. देयक सादर केल्यानंतर देयकांची रक्कम ३० दिवसांच्या आत ई-पेमेंटद्वारे अदा करण्यात येईल

(४) संपूर्ण देखभाल व दूरूस्ती करारांतर्गत देखभाल, यंत्राच्या पार्टसमध्ये बिघाड झाल्यास तो बदलून त्याच कंपनीचा पार्टस / स्पेअर पार्टस बसवून सदर यंत्रणा पूर्ववत कार्यरत करणे, डिजिटल दूरध्वनी संच उपलब्ध करुन देणे इ. समावेश आहे.

(५) तातडीच्या प्रसंगी सूचना मिळताच अल्प कालावधीत मॅकॅनिकची सेवा उपलब्ध करणे आपणांवर बंधनकारक राहिल. तसेच कार्यालयात येणा-या मॅकॅनिकला कोणताही खर्च अदा केला जाणार नाही.

(६) पॅनासोनिक कंपनीचे ई.पी.बी.ए.एक्स. दूरध्वनी संच आपल्या कंपनीकडे दुरूस्तीकरीता पाठविणे आवश्यक असल्यास ते पाठविण्यापूर्वी आपल्या कंपनीकडून एक सुस्थितीत असणारे दूरध्वनी संच सदरहू यंत्राच्या बदली कार्यालयास स्थापित करुन कार्यान्वित करणे बंधनकारक राहील.

(७) दर नमुद करताना GST शिवाय इतर कोणताही कर अंतर्भूत नसावा.

(८) प्राधिकरण कोणत्याही कारणाशिवाय कोणतीही निविदा/दरपत्रक फेटाळण्याचे हक्क राखुन ठेवीत आहे.

**सचिव,**
**कार्यकारी समिती**
**(अति.कार्य.)**